BIBLE
316

# बायबल (पवित्र शास्त्र) काय आहे?

**बायबल (पवित्र शास्त्र) काय आहे?** ते परमेश्वर तुमच्याशी बोलत आहे. ते केवळ परमेश्वराबद्दल नाही. ते परमेश्वराकडून आहे. ते प्रेरणा देण्यापेक्षाही जास्त आहे. ते परमेश्वरप्रेरित आहे (परमेश्वराचा श्वास असलेले). ते वाचा. ते ऐका. त्याबद्दल विचार करा. त्यातून शिका. ते तुमच्या जीवनात लागू करा. प्रेषित पेत्राने लिहिले, *“प्रभू कृपाळू आहे ह्याचा तुम्ही अनुभव घेतला आहे,’ तर (तारणासाठी) तुमची आध्यात्मिक वृद्धी व्हावी म्हणून नूतन जन्मलेल्या बालकांसारखे वचनरूपी निऱ्या दुधाची इच्छा धरा,”* १ पेत्र २:२.

**कोणती गोष्ट बायबल (पवित्र शास्त्रा) स अद्वितीय ठरवते?** सुमारे १,६००वर्षांच्या कालावधीत बायबल (पवित्र शास्त्रा) ची ६६ पुस्तके तीन भाषांमध्ये (हिब्रु, अरामी आणि ग्रीक) चाळीसहून अधिक माणसांनी लिहिली आहेत आणि शतकानुशतके एकच समान आणि सुसंगत विषय लिहिण्यात आला आहे. नवीन करार ५,००० हून अधिक प्राचीन पूर्ण किंवा आंशिक हस्तलिखितांमधून प्रमाणित झाला आहे. बायबल (पवित्र शास्त्रा) ची पूर्ण झालेली भाकिते, आधुनिक पुरातत्वीय शोध, भौगोलिक तंतोतंतपणा आणि नीतिसूत्रांचे कालातीत ज्ञान याद्वारे त्याच्या यथार्थतेची पडताळणी करण्यात आली आहे. बायबल (पवित्र शास्त्र) हे आतापर्यंत लिहिण्यात आलेले सर्वात महत्वाचे आणि प्रभावशाली पुस्तक आहे. इतर कोणत्याही पुस्तकाच्या इतक्या प्रती छापल्या गेलेल्या नाहीत, इतक्या मोठ्या प्रमाणात वितरित करण्यात आलेल्या नाहीत, अनेकविध भाषांमध्ये भाषांतरित करण्यात आलेल्या नाहीत, इतक्या सामर्थ्यपूर्णरित्या जीवनांत बदल घडलेला नाही. इतकी शतके त्यांनी टिकाव धरलेला नाही. आपला काय विश्वास असावा आणि आपण कसे जगावे यासाठी बायबल (पवित्र शास्त्र) हा एकमेव अंतिम अधिकार आहे. बायबल (पवित्र शास्त्र) इतर सर्व पुस्तकांत सर्वश्रेष्ठ आहे.

**बायबलची (पवित्र शास्त्र) वैशिष्ट्ये काय आहेत?**

बायबल (पवित्र शास्त्र) हे परमेश्वराचा श्वास आहे. *“प्रत्येक परमेश्वरप्रेरित शास्त्रलेख ... आहे,”* २ तीमथ्य ३:१६.

बायबल (पवित्र शास्त्र) सत्य आहे. येशूने प्रार्थना केली, *“तू त्यांना सत्यात समर्पित कर; तुझे वचन हेच सत्य आहे,”* योहान १७:१७.

बायबल (पवित्र शास्त्र) तंतोतंतपणे अचूक आहे. येशू म्हणाला, *“कारण मी तुम्हाला खरे सांगतो, जोपर्यंत आकाश आणि पृथ्वी नाहीशी होत नाहीत तोपर्यंत नियमशास्त्रातील एकही लहान अक्षर किंवा कण नाहीसा होणार नाही, जोपर्यंत सर्व काही पूर्ण होत नाही,”* मत्तय ५:१८ मूळ हस्तलिखितांचा तंतोतंतपणा अशा प्रकारे राखला गेला आहे की आजचे सर्वोत्तम शब्दशः भाषांतर ९९ टक्केपेक्षा जास्त यथार्थ आहे.

बायबल (पवित्र शास्त्र) शुद्ध आहे. *“परमेश्वराची वचने शुद्ध वचने आहेत; भट्टीत सात वेळा शुद्ध करून जमिनीवरील मुशीत ओतलेल्या रुप्यासारखी ती आहेत,”* स्तोत्र १२:६.

बायबल (पवित्र शास्त्र) शाश्वत आहे. *“गवत सुकते, फूल कोमेजते, पण आमच्या देवाचे वचन सर्वकाळ कायम राहते,”* यशया ४०:८. बायबल (पवित्र शास्त्र) आजही तितकेच प्रासंगिक आहे जितके ते पहिल्यांदा लिहिले गेले तेव्हा होते.

बायबल (पवित्र शास्त्र) सामर्थ्यवान आहे. इब्री लोकांस ४:१२, *“कारण देवाचे वचन सजीव, सक्रिय, कोणत्याही दुधारी तलवारीपेक्षा तीक्ष्ण असून, जीव व आत्मा, सांधे व मज्जा ह्यांना भेदून आरपार जाणारे आणि मनातील विचार व हेतू ह्यांचे परीक्षक असे आहे.”*

**बायबल (पवित्र शास्त्रा) द्वारे कोणते वैयक्तिक फायदे मिळतात?**

बायबल (पवित्र शास्त्र) आपल्याला सुसज्ज करते. *“प्रत्येक परमेश्वरप्रेरित शास्त्रलेख सद्बोध, दोष दाखवणे, सुधारणूक, नीतिशिक्षण ह्यांकरता उपयोगी आहे, ह्यासाठी की, देवाचा भक्त पूर्ण होऊन प्रत्येक चांगल्या कामासाठी सज्ज व्हावा,”* २तीमथ्य ३:१६-१७.

बायबल (पवित्र शास्त्र) आपल्याला पाप न करण्यास मदत करते. स्तोत्र ११९:९, ११ आपल्याला ते कसे होणार ते सांगते. *“तरुण आपला वर्तनक्रम कशाने शुद्ध राखील? तुझ्या वचनानुसार तो राखण्याने.”* आणि *“मी तुझ्याविरुद्ध पाप करू नये म्हणून मी आपल्या मनात तुझे वचन जपून ठेवले आहे.”*

बायबल (पवित्र शास्त्र) आपल्याला आजसाठी (आपल्या पुढील पायरीसाठी) मार्गदर्शन आणि आपल्या भविष्यासाठी (अनुसरणारा मार्ग) दिशा देते. *“तुझे वचन माझ्या पावलांसाठी दिव्यासारखे व माझ्या मार्गावर प्रकाशासारखे आहे,”* स्तोत्र ११९:१०५.

बायबल (पवित्र शास्त्र) ज्ञान देते. *“तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो; त्याने भोळ्यांना ज्ञान प्राप्त होते,”* स्तोत्र ११९:१३०. जुन्या करारातील नीतिसूत्रांमध्ये कालातीत ज्ञान आढळते.

बायबल (पवित्र शास्त्र) आपल्याला अडचणीतून बाहेर पडण्यास मदत करते. स्तोत्र ११९:५० आपल्याला प्रोत्साहन देते, *“माझ्या दुःखात माझे सांत्वन हे आहे की, तुझे वचन मला नवजीवन देते.”*

बायबल (पवित्र शास्त्र) आशा देते. *“धीराच्या व शास्त्रापासून मिळणाऱ्या उत्तेजनाच्या योगे आपण आशा धरावी म्हणून जे काही शास्त्रात पूर्वी लिहिले ते सर्व आपल्या शिक्षणाकरता लिहिले,”* रोम १५:४.

बायबल (पवित्र शास्त्र) शांती देते. स्तोत्र ११९:१६५ वचन देते, *“तुझे नियमशास्त्र प्रिय मानणाऱ्यांना फार शांती असते. त्यांना अडखळण्याचे कारण पडणार नाही.”*

बायबल (पवित्र शास्त्र) आनंद देते. यिर्मया १५:१६ एक उदाहरण देते, *“मला तुझी वचने प्राप्त झाली ती मी स्वीकारली; तुझी वचने माझा आनंद, माझ्या जिवाचा उल्लास अशी होती; कारण हे परमेश्वरा, सेनाधीश देवा, तुझे नाम घेऊन मी आपणास तुझा म्हणवतो.”*

**एखाद्याने बायबल (पवित्र शास्त्र) कसे वाचावे किंवा ऐकावे?** एकापेक्षा जास्त वचने तपासून पाहावी. या चार उद्देशांचा विचार करावा “प्रत्येक परमेश्वरप्रेरित शास्त्रलेख सद्बोध, दोष दाखवणे, सुधारणूक, नीतिशिक्षण ह्यांकरता उपयोगी आहे,” २तीमथ्य ३:१६ ते वाचताना किंवा ऐकताना, हे चार प्रश्न विचारा. हे मला काय शिकवते? हे मला कसे दोषी ठरवते? मला कोणत्या सुधारणा कराव्या लागतील? हे मला अधिक नीतिमान होण्यासाठी कसे प्रशिक्षित करते?

**जर माझ्याकडे बायबल (पवित्र शास्त्र) नसेल तर काय?** बायबल (पवित्र शास्त्रा) चे चांगले भाषांतर खरेदी करण्यासाठी शक्य तितके प्रयत्न करा. जर तुम्ही ते खरेदी करू शकत नसाल, तर अनेक आवृत्त्या ऑनलाइन वाचनासाठी किंवा ऐकण्यासाठी मोफत उपलब्ध आहेत. एखाद्या मित्रासोबत किंवा मित्रांसोबत बायबल (पवित्र शास्त्र) खरेदी करण्याचा आणि ते शेअर करण्याचा विचार करा. किंवा तुमच्या मंडळीस किंवा सोबतच्या विश्वासूंना सांगा की त्यांनी एका व्यक्तीला गटास बायबल (पवित्र शास्त्र) वाचून दाखवण्यास सांगावे आणि त्यांनी लक्षपूर्वक ऐकावे. *“पण त्यापेक्षा जे देवाचे वचन ऐकतात व पाळतात ते धन्य!”* लूक ११:२८.

**बायबल (पवित्र शास्त्र) शिक्षक आणि पुढार्यांसाठी काही खास वचने कोणती आहेत?** वचनात राहून येशूचे शिष्य व्हा. “ज्या यहूद्यांनी त्याच्यावर विश्वास ठेवला त्यांना येशू म्हणाला, *“तुम्ही माझ्या वचनात राहिलात तर खरोखर माझे शिष्य आहात”* योहान ८:३१. स्वीकृत होण्यासाठी बायबलचा अभ्यास करा. *“तू सत्याच्या वचनाची योग्य विभागणी करून नीट सांगणारा, लाज वाटण्यास कसलेही कारण नसलेला, देवाच्या पसंतीस उतरलेला कामकरी, असा स्वत:ला सादर करण्यास होईल तितके कर.”* २ तीमथ्य २:१५.

**बायबल (पवित्र शास्त्र) हे शाश्वत काळासाठी महत्त्वाचे का आहे?** प्रेषित योहानाने शुभवर्तमान लिहिण्याचा त्याचा उद्देश स्पष्ट केला. तो उद्देश संपूर्ण बायबलला (पवित्र शास्त्र) लागू करता येतो. *“म्हणूनच येशूने शिष्यांच्या उपस्थितीत इतर अनेक चिन्हे देखील केली, जी या पुस्तकात लिहिलेली नाहीत; परंतु ही चिन्हे यासाठी लिहिली आहेत की तुम्ही विश्वास ठेवावा की येशू हाच ख्रिस्त आहे, देवाचा पुत्र आहे; आणि विश्वास ठेवून तुम्हाला त्याच्या नावाने जीवन मिळेल,”* योहान २०:३०-३१. तुम्ही येशूवर विश्वास कसा ठेवता आणि अनंतकाळचे जीवन कसे मिळवता? www.Gospel316.org वर कसे ते शोधा.

**“गवत सुकते, फूल कोमेजते, पण आमच्या देवाचे वचन सर्वकाळ कायम राहते.” यशया ४०:८.**

---

जॉन डी. मॉरिस तृतीयद्वारे लिखित *बायबल (पवित्र शास्त्र) काय आहे?* © २०२५ हे पुस्तक ॲक्ट्स वन एट यांनी प्रकाशित केले आहे. तुम्ही त्यातील माहिती मजकूर न बदलता आणि हयातील संपूर्ण निवेदन समाविष्ट करण्याची अनिवार्यता लक्षात घेत मोफत छापू शकता, प्रत तयार करू शकता, डाकद्वारे पाठवू शकता, ई-मेल करू शकता किंवा संदेशाद्वारे पाठवू शकता तुम्ही पहिल्या पानाच्या वरच्या भागात तुमच्या सेवासंस्थेचे किंवा मंडळीचे नाव व लोगो लावू शकता. तसेच दुसऱ्या पानाच्या खालच्या बाजूस असलेल्या आडव्या रेषेच्या वर तुमची संपर्क माहिती जोडू शकता. Bible316 हे केवळ बायबलवर आधारित आहे. याचे उद्दिष्ट आहे लोकांना येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवण्यात मदत करणे आणि त्यानंतर त्याचे शिष्य म्हणून वाढण्यासाठी मार्गदर्शन करणे. तुम्ही Acts One Eight ला (शक्य असल्यास इंग्रजीत) Hello@Mail316.org वर ई-मेल करू शकता. इंग्रजी नसलेल्या आवृत्त्यांसाठी भाषांतर सेवा www.ChristianLingua.com द्वारे प्रदान केल्या गेलेल्या आहेत. बायबल (पवित्र शास्त्र) काय आहे? हे ४८ भाषांमध्ये www.Bible316.org. वर मोफत उपलब्ध आहे. इंग्रजी आवृत्तीतील बायबलचे कोटेशन द लॉकमन फाउंडेशनच्या न्यू अमेरिकन स्टँडर्ड बायबल १९९५ मधील आहेत. या भाषांतरात दिलेली बायबलमधील अवतरणे बायबल सोसायटी ऑफ इंडियामधून घेतलेली आहेत.